**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि. कोल्हापूर यांचे न्यायालयात**
**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ६५२/२०२२ मध्ये**
**फौजदारी प्रक्रिया संहितेच्या प्रकरण २० प्रमाणे आरोपीचे प्रतिकथन**

**निशाणी क्र. /ब**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | – | २६/०९/२०१८ |
| अहवाल दाखल दिनांक | – | १०/१०/२०२२ |
| फिर्यादीचे नाव व पत्ता | – | महाराष्ट्र शासन तर्फे पोलीस अधिकारी,<br>जयसिंगपूर पोलीस स्टेशन, |
| आरोपीचे नाव व पत्ता | – | **सौरभ शशिकांत कांबळे,**<br>रा.उदगांव, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर. |

**गुन्ह्याचा मजकूर** –

मी दखल घेतल्याप्रमाणे तुम्ही दिनांक २६/०९/२०१८ रात्री ०८.१२ वाजण्याच्या सुमारास कोंडीग्रे ग्रामपंचायत समोर, कोंडीग्रे, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर येथे तुमच्या ताब्यातील एम.एच–१०/सी.ए.६५७० या क्रमांकाची बोलेरो पिकअप गाडी वाहतुक नियमांचा भंग करुन सार्वजनिक ठिकाणी तेथील परिस्थितीचा विचार न करता अशा पद्धतीने व अशा वेगात चालवली की जेणेकरुन मानवी जिवीतास किंवा सार्वजनिक सुरक्षिततेस धोका पोहचेल, आणि त्याअन्वये तुम्ही मोटार वाहन कायद्याच्या कलम **१८४** प्रमाणे शिक्षेस पात्र असलेला असा अपराध केलेला आहे.

**आरोपीचे प्रतिकथन –**

प्रश्न क्र.१ – तुम्हांला पोलिस कागदपत्रांच्या नकला मिळाल्या काय ?

उत्तर – होय.

प्रश्न क्र.२ – तुम्हांला आता न्यायालयाने वाचून व समाजावून सांगितलेला मजकूर समजला काय ?

उत्तर – होय.

प्रश्न क्र. ३ – तुम्हांला गुन्हा कबुल आहे काय ?

उत्तर – होय, मला गुन्हा कबुल आहे.

समक्ष,

------------

आरोपीची सही / अंगठा

Digitally signed by Anand Devidasrao Karbhajan
Date: 2022.10.11 17:13:33 +0530

**( आनंद दे. करभाजन )**
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
जयसिंगपूर, ता. शिरोळ, जिल्हा कोल्हापूर.

ठिकाण :– जयसिंगपूर.
दिनांक :– ११/१०/२०२२

# <u>नि का ल प त्र</u>

आरोपीचे प्रतिकथन नोंदविले. त्याद्वारे त्यास त्याच्यावर लावण्यात आलेले आरोप मान्य व कबुल असल्याचे कथन केले आहे. त्याच्यावर त्याच्या कुटूंबाचा उदरनिर्वाह अवलंबून आहे असे त्याने सादर केले. त्यामुळे कमीत कमी दंड करावा अशी त्याने विनंती केली. त्याचवेळी आरोपीची आर्थिक परिस्थितीचा देखील विचार करणे आवश्यक आहे. सदर गुन्ह्याकरिता कारावासाची किंवा द्रव्यदंडाची किंवा दोन्ही शिक्षांची तरतूद आहे. मात्र आरोपीला कारावसाच्या शिक्षेऐवजी द्रव्यदंडाची शिक्षा सुनावणे न्यायोचित राहील असे माझे मत बनते. करिता आरोपीच्या आर्थिक परिस्थितीचा व गुन्ह्याच्या गांभीर्यांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## <u>आ दे श</u>

१} आरोपी **सौरभ शशिकांत कांबळे** यास मोटार वाहन कायद्याच्या कलम **१८४** या कलमाखाली शिक्षेस पात्र गुन्ह्याकरिता फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २५२ प्रमाणे दोषी ठरविण्यात येते.

२} आरोपीला मोटार वाहन कायद्याच्या कलम **१८४** या कलमाखाली शिक्षेस पात्र गुन्ह्याकरिता रक्कम **रुपये ७००/-** (अक्षरी रुपये सातशे मात्र) इतक्या द्रव्यदंडाची आणि दंड न भरल्यास ०८ दिवसाच्या साध्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात येते.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by Anand Devidasrao Karbhajan
Date: 2022.10.11 17:13:40 +0530

**( आनंद दे. करभाजन )**
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
जयसिंगपूर, ता. शिरोळ, जिल्हा कोल्हापूर.

ठिकाण :- जयसिंगपूर.
दिनांक :- ११/१०/२०२२